ePaper

## मराठा आंदोलनामागे राजकीय अजेंडा? राज ठाकरेंना संशय!



| वर्ष - 7 | अंक - 262 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 03 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- 'यशस्वी'पणे लढवला किल्ला!
- 'नो एन्ट्री 2' मधून सलमानचा पत्ता कट
- ज्ञानवापी तळघरात पूजा सुरूच
- गळ्यात गळे घालायला फडणवीस नाही

# मावळ तालुक्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना मिळणार गती!

## मंत्रालयात बैठक: विविध विकासकामे, सद्यस्थिती व कार्यवाही यावर सविस्तर चर्चा

**| मुंबई | महाईन्यूज**

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मावळ विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती देण्यासाठी मंत्रालयात गुरुवार (दि.१) बैठक उत्साहात पार पडली. याबैठकीत मावळ तालुक्यातील विविध विकासकामे, महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची सद्यस्थिती व पुढील कार्यवाही यावर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, आमदार सुनिल शेळके तसेच वित्त व नियोजन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.**



### यावर सविस्तर चर्चा

» आई एकविरा देवी मंदिर परिसर विकास आराखडा व रोप-वे उभारणे कामास गती देण्यासाठी वन विभाग व पुरातत्व विभागाच्या संपूर्ण परवानग्या (NOC) दोन महिन्याच्या आत घेण्याच्या सुचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

» जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी कार्ला ते देहूरोड दरम्यान आवश्यक असलेल्या आठ ठिकाणी उड्डाणपूल उभारण्यासाठीच्या प्रस्तावाला MSRDC च्या अधिकाऱ्यांनी केंद्रीय स्तरावर पाठपुरावा करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

» जांभूळ येथे क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव महसूल विभागाकडे सादर केलेला असून तालुकास्तरीय अद्ययावत क्रिडा संकुल उभारण्यासाठी तात्काळ मान्यता द्यावी.

» ग्लास स्कायवॉक प्रकल्पाचा संपूर्ण विकास आराखडा राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

> उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी या प्रकल्पांना गती देण्याच्या सुचना बैठकीत दिल्याने मावळच्या सर्वांगीण विकासाच्या दूरदृष्टीतून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या कामांचा वेग वाढणार आहे.
>
> **– आमदार सुनिल शेळके,** मावळ विधानसभा

# चिखली येथे गॅस सिलेंडर अवैध साठा जप्त कारवाई!

## अन्नधान्य वितरण कार्यालयाकडून 35 लाख 72 हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेअन्नधान्य वितरण कार्यालयाच्यावतीने मोरे वस्ती, चिखली, पिंपरी चिंचवड येथे बुधवारी छापा टाकून मामा गॅस सर्विस एजन्सीविरुद्ध गॅस सिलेंडरची अवैध साठवणूक, वाहतूक या अनुषंगाने मोठी कारवाई करत ३५ लाख ७३ हजार ५४५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी दादासाहेब गिते यांनी दिली. या कारवाईमध्ये ४ मोठी वाहने, हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस भरलेले १०५ सिलेंडर व रिकामे ६०२ सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईत आरोपी भिकचंद हिरालाल कात्रे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

कात्रे यांच्याविरुद्ध चिखली पोलीस ठाण्यात भादवी कलम ४२०, २८५, २८६ सह जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ नुसार तसेच एलपीजी (पुरवठा व वितरण आदेश) आदेश २००० चे कलम ३ ते ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



### यांनी केली कारवाई...

» ही कारवाई परिमंडळ अधिकारी सचिन काळे, पुरवठा निरीक्षक श्रीमती स्नेहल गायकवाड, अमोल हाडे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय मोरे आदींनी केली आहे, असेही गिते यांनी कळविले आहे.

# पालिकेकडून कोट्यवधी निविदांचा पाऊस!

## दोन दिवसांत कालावधीत किमान 150 कोटींच्या 138 निविदा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नगरसेवकांच्या दबावामुळे मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणावर निविदा काढाव्या लागत असल्याचा दावा करणाऱ्या महापालिकेने आर्थिक वर्ष संपुष्टात येत असताना आणि लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या शक्यतेने ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी या दोन दिवसांच्या कालावधीत किमान १५० कोटींच्या १३८ निविदा काढल्या आहेत.**




विविध विभागांनी या निविदा काढल्या असून, १० लाखांपासून कोट्यवधी रुपयांपर्यंतची कामे यामध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत.अंदाजपत्रकातील कामे पूर्ण करण्यासाठी वर्षभराचा कालावधी असतानाही आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याने त्याबाबत शंका उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे.महापालिका प्रशासनाकडून अंदाजपत्रकात कोट्यवधी रुपयांची कामे प्रस्तावित केली जातात. या कामांसाठी विभागनिहाय आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाते. नव्या आर्थिक वर्षाच्या एक एप्रिलपासून अंदाजपत्रकाची अंमलबजावणी सुरू होते. कामांसाठी तरतूद असल्याने ही कामे मुदतीमध्ये पूर्ण करणे अपेक्षित असते. मात्र महापालिका प्रशासनाने यंदा शेवटच्या टप्प्यात निविदा काढण्याचा विक्रम केला आहे. लोकसभा निवडणूक एप्रिल-मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्याची आचारसंहिता मार्च महिन्याच्या मध्यापासून लागेल, असा प्रशासकीय अंदाज आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी २५ फेब्रुवारीपर्यंत निविदाप्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश खातेप्रमुखांना दिला आहे. त्यानुसार उद्यान, पाणीपुरवठा, मलनि:सारण, पथ, विद्युत विभागाबरोबरच सर्व क्षेत्रीय कार्यालयांकडून लहान-मोठ्या कामांच्या निविदा काढण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार गेल्या दोन दिवसांत सुमारे दीडशे कोटींच्या १३८ निविदा काढण्यात आल्या आहेत. अंदाजपत्रकातील निधी वाया जाऊ नये, यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती जाण्यापूर्वीही अंदाजपत्रकाच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात नगरसेवकांकडून विविध कामांचे प्रस्ताव स्थायी समितीमार्फत मुख्य सभेत मंजूर करून घेतले जात होते. त्यासाठी निविदाप्रक्रिया राबविण्याची चढाओढ सर्वपक्षीय नगरसेवकांमध्ये दिसून येत होती. तर अंदाजपत्रकातील विविध कामांचा शिल्लक राहिलेला निधी अन्य कामांसाठी खात्याकडून वर्ग करून घेतला जात होता. त्यामुळे अंदाजपत्रकाची अंमलबजावणी किती झाली, याबाबतही कायम शंका उपस्थित होत होती. सध्या योजना, प्रकल्पांसाठी राखीव असलेला निधी अन्य कामांसाठी वळविण्याचे प्रस्ताव विभागांकडून स्थायी समितीला देण्यास सुरुवात झाली आहे. या निविदा काढल्या असून, १० लाखांपासून कोट्यवधी रुपयांपर्यंतची कामे यामध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत. अंदाजपत्रकातील कामे पूर्ण करण्यासाठी वर्षभराचा कालावधी असतानाही आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याने त्याबाबत शंका उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे.

### लहान-मोठ्या कामांच्या निविदा

महापालिका प्रशासनाकडून अंदाजपत्रकात कोट्यवधी रुपयांची कामे प्रस्तावित केली जातात. या कामांसाठी विभागनिहाय आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाते. नव्या आर्थिक वर्षाच्या एक एप्रिलपासून अंदाजपत्रकाची अंमलबजावणी सुरू होते. मात्र महापालिका प्रशासनाने यंदा शेवटच्या टप्प्यात निविदा काढण्याचा विक्रम केला आहे. लोकसभा निवडणूक एप्रिल-मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्याची आचारसंहिता मार्च महिन्याच्या मध्यापासून लागेल, असा प्रशासकीय अंदाज आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी २५ फेब्रुवारीपर्यंत निविदाप्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश खातेप्रमुखांना दिला आहे. त्यानुसार उद्यान, पाणीपुरवठा, मलनि:सारण, पथ, विद्युत विभागाबरोबरच सर्व क्षेत्रीय कार्यालयांकडून लहान-मोठ्या कामांच्या निविदा काढण्यास सुरुवात झाली आहे.

# पुणे लोकसभेसाठी मनसेच्या उमेदवारांचा अहवाल

## राज ठाकरे यांची घोषणाः निवडणुकीसाठी पाच पदाधिकाऱ्यांची नावे निश्चित

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून पुणे लोकसभा निवडणुकीसाठी पाच पदाधिकाऱ्यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. निश्चित केलेल्या पाच नावांचा अहवाल अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. या पाचमधून राज ठाकरे एका नावाची घोषणा करणार आहेत. मात्र सध्याच्या नावांबरोबर भविष्यात आणखी काही नावांची चर्चा होऊ शकते, असा दावा मनसे पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.**



काही ठिकाणी मतदारसंघात उमेदवार देण्याची घोषणा मनसेकडून करण्यात आली आहे. त्यादृष्टीने पुण्यात मनसेची संघटनात्मक बांधणी सुरू झाली आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने पुणे दौऱ्यावर येत असून विधानसभा मतदारसंघ निहाय आढावा बैठकाही पक्षाच्या स्तरावर सुरू झाल्या आहेत. मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांना पुणे लोकसभेच्या समन्वयाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.लोकसभेची निवडणूक एप्रिल-मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मनसेकडून उमेदवारांची चाचपणीही सुरू करण्यात आली होती. त्यानुसार पक्षाने माजी गटनेते वसंत मोरे, शहराध्यक्ष साईनाथ बाबर, बाबू वागसकर, किशोर शिंदे आणि गणेश सातपुते या पाच जणांची नावे राज ठाकरे यांना कळविली आहेत. या नावामधून एका नावाची घोषणा राज ठाकरे यांच्याकडून करण्यात येणार आहे. दरम्यान, उमेदवारीचा अंतिम निर्णय घेण्यासाठी अजून वेळ आहे. त्यामुळे चर्चेत असलेल्या नावांमध्ये काही नावांचा समावेश होऊ शकतो, असे मनसे पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.राज यांचे चिरंजीव अमित यांना पुणे लोकसभेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यादृष्टीने अमित सातत्याने बैठका घेत असून संघटनात्मक बांधणीला त्यांनी प्राधान्य दिले आहे. लोकसभेची जबाबदारी असल्याने पुण्यातील उमेदवार निश्चित करण्याची त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे.

### मनसेची संघटनात्मक बांधणी

काही ठिकाणी मतदारसंघात उमेदवार देण्याची घोषणा मनसेकडून करण्यात आली आहे. त्यादृष्टीने पुण्यात मनसेची संघटनात्मक बांधणी सुरू झाली आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने पुणे दौऱ्यावर येत असून विधानसभा मतदारसंघ निहाय आढावा बैठकाही पक्षाच्या स्तरावर सुरू झाल्या आहेत. मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांना पुणे लोकसभेच्या समन्वयाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.लोकसभेची निवडणूक एप्रिल- मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मनसेकडून उमेदवारांची चाचपणीही सुरू करण्यात आली होती. त्यानुसार पक्षाने माजी गटनेते वसंत मोरे, शहराध्यक्ष साईनाथ बाबर, बाबू वागसकर, किशोर शिंदे आणि गणेश सातपुते या पाच जणांची नावे राज ठाकरे यांना कळविली आहेत.

## केंद्र सरकारची कानउघडणी: राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर हल्लाबोल

# खासदार कोल्हे 'ऑन फायर मोड'!

## अर्थसंकल्पीय अधिवेशन : रेडझोन, शेतकरी आक्रोशकडे लक्ष वेधले

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्र केवळ ना इमारतींनी, ना पूल बांधून किंवा इन्फ्रास्ट्रक्चर आणि बजेटच्या आकड्यांची बनत नाही, तर देशवासियांच्या हृदयातील उत्कट देशभक्तींमुळे राष्ट्र बनते' अशा शब्दात केंद्र सरकारची कानउघडणी करत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना सरकारला धारेवर धरले. रेडझोन, शेतकऱ्यांचा आक्रोश, बिबट प्रजनन नियंत्रण प्रश्नांकडे लक्ष वेधले.**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात झालेल्या राष्ट्रपतींच्या अभिभाषणात उल्लेख झालेल्या भयमुक्त वातावरणासंदर्भात बोलताना खासदार डॉ. कोल्हे यांनी शिरुर लोकसभा मतदारसंघातील ज्वलंत समस्या बनलेल्या बिबट्यांच्या उपद्रवाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. प्रत्येक देशबांधवाला भयमुक्त वातावरणात जीवन व्यतीत करण्याची इच्छा आहे. परंतु माझ्या शिरूर लोकसभा मतदारसंघात तशी परिस्थिती नाही. या ठिकाणी दिवसा थ्री फेज वीज पुरवठा होत नाही. त्यामुळे शेतीला पाणी देण्यासाठी रात्रीच्या अंधारात जावे लागते. अशा परिस्थितीत रोज कुठे ना कुठे नागरिकांवर बिबट्याचा हल्ला होत असतो. आजपर्यंत १८ हजार लोकांचं नुकसान झालं आहे, तर २२-२५ लोकांनी आपला जीव गमावला आहे, याकडे खासदार डॉ. कोल्हे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

ते पुढे म्हणाले की, नॅशनल वाईल्ड लाईफ सर्व्हेच्या अहवालाचा अभ्यास केला तर शिरुर लोकसभा मतदारसंघात बिबट्यांची संख्या जवळपास ४०० ते ५०० इतकी आहे. त्यामुळे जुन्नर वनविभागाने राज्य सरकारकडे बिबट प्रजनन नियंत्रणाचा प्रस्ताव पाठवला आहे. खरं तर हाच एकमेव पर्याय आहे असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या संदर्भात अभ्यास करून बिबट प्रजनन नियंत्रण धोरण लागू करावे अशी मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी केली. तसेच शिरुर लोकसभा मतदारसंघात शेतकऱ्यांना दिवसा थ्री फेज वीज पुरवठा करण्याचे निर्देश महाराष्ट्र सरकारला द्यावेत अशी मागणीही केली.



पिंपरी-चिंचवड परिसरातील 'रेडझोन'च्या प्रश्नी संसदेत जोरदार आवाज उठवताना खासदार डॉ. कोल्हे यांनी केंद्र सरकारच्या धोरणातील विसंगतीवर बोट ठेवले. ते म्हणाले की, राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात गरीबांसाठी घरांचा उल्लेख केला तो निश्चितच स्तुत्य आहे. परंतु माझ्या शिरूर लोकसभा मतदारसंघात जवळपास दीड-दोन लाख नागरिक असे आहेत की, ते पक्क्या घरात रहात असले तरी ॲम्युनिशन फॅक्टरीच्या रेडझोनमुळे अनधिकृत ठरले आहेत, या वास्तवतेकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, एकीकडे आपण कायद्यात सुधारणा करण्याच्या गोष्टी करतो. पण रेडझोनसाठी आपण १९०३ चा ब्रिटीशकालीन (Dr. Amol kolhe) इंडियन डिफेन्स ॲक्टनुसार २ हजार यार्ड मर्यादा आखतो. पण १९७० सालच्या युनायटेड नेशनच्या स्टोरेज टेक्निकल एक्स्प्लोसिव्ह कमिटीच्या आपण स्वीकारलेल्या कायद्यानुसार २०० ते ५०० मीटर इतकीच रेडझोनची मर्यादा असली पाहिजे याचा विचार करत नाही, असे सांगून खासदार डॉ. कोल्हे यांनी १९७० साली आपण स्वीकारलेल्या कायद्यानुसार ५०० मीटर रेडझोनची मर्यादा करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी केली. केंद्र सरकारच्या कथनी आणि करणीतील फरक दाखवताना खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा व कृषी मालाच्या निर्यातीबाबत उल्लेख केला, पण प्रत्यक्षात सरकारच्या शेतकऱ्यांविषयीच्या धोरणातील विसंगतीवर त्यांनी बोट ठेवले.

> " सन २०१३ मध्ये डीएपीची बॅगची किंमत ५६० रुपये होती, तर २०२४ मध्ये या बॅगची किंमत ११०० रुपये झाली तर मजुरीचा दर ५ हजार होता तो आता ११ हजार झाला, असे असताना २०१३ मध्ये कांद्याचा दर होता २० रुपये किलो आणि आज २०२४ मध्ये कांद्याचा दर ८-१० रुपये किलो आहे. मग शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले की, दुप्पटीने कमी झाले असा वस्तुनिष्ठ सवाल खासदार डॉ. कोल्हे यांनी केला. आपण विकसित भारताचा एक स्तंभ मानता. पण जशी दिल्लीत थंडी आहे हे सांगावे लागत नाही तर तीचा अनुभव येतो. तसा विकसित भारत आहे हे सांगावे का लागते? त्याचा प्रत्यय शेतकऱ्यांना का येत नाही.
>
> **-डॉ. अमोल कोल्हे,** खासदार

---

## दिवंगत लक्ष्मणभाऊ यांना अयोध्येत आदरांजली

## मोदी 2.0 ग्रुप अन् मिशन डेव्हलप भारत ग्रुपच्या सदस्यांनी घेतले रामलल्लाचे दर्शन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अयोध्येतील रामजन्मभूमीत ५०० वर्षानंतर भव्य राम मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. या मदिरांत जाऊन रामलल्लाचे दर्शन देशभरातील हिंदू भाविक सध्या घेत आहेत, पिंपळे सौदागर येथील मोदी २.० ग्रुप आणि मिशन डेव्हलप भारत ग्रुपच्या सदस्यांनीही अयोध्येत जाऊन रामलल्लाचे दर्शन घेतले. दर्शनानंतर या सदस्यांनी पिंपरी-चिंचवडचे लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांना राम मंदिराजवळ आदरांजली वाहिली. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी हिंदू धर्माविषयी केलेल्या कार्याबद्दल या सर्वांनी आदर व्यक्त केला.**




अयोध्येत भव्य राम मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरात रामलल्ला मूर्तीची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गेल्या महिन्यात २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर रामलल्लाच्या दर्शनासाठी देशभरातील लाखो हिंदू भाविक अयोध्येत जात आहेत. पिंपरी-चिंचवडमधीलही शेकडो रामभक्त अयोध्येत जाऊन रामलल्लाचे दर्शन घेत आहेत. पिंपळेसौदागर येथील मोदी २.० ग्रुप आणि मिशन डेव्हलप भारत ग्रुपच्या सदस्यांनी अयोध्येत जाऊन रामलल्लाचे दर्शन घेतले. दर्शनानंतर सर्व सदस्यांनी पिंपरी-चिंचवडचे लोकनेते दिवंगत आमगार लक्ष्मणभाऊ जगताप यांना राम मंदिराजवळ आदरांजली वाहिली. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप हे पिंपरी-चिंचवडचे लोकनेते होते. त्यांनी या शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. नगरसेवक, महापौर, आमदार या पदांवर काम करताना दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी शहराच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले.

### अयोध्येत यांची प्रामुख्याने उपस्थिती

**दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी केवळ शहराचा विकासच नाही, तर हिंदू धर्मासाठी देखील अनेक कामे केली आहेत. श्री श्री रविशंकर, वामनराव पै, बाबा रामदेव यांचे पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच कार्यक्रम आयोजित केले व राममंदिर निधी संकलन अभियानामधे देखील महत्वाची भुमिका बजावली होती. त्याचप्रमाणे इतर काही हिंदू साधुसंतांचे कार्यक्रण घेऊन दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी हिंदुत्व जोपासले होते. त्यांच्या या हिंदुत्ववादी कार्याविषयी आदर व्यक्त करण्याच्या उद्देशाने पिंपळेसौदागर येथील मोदी २.० ग्रुप आणि मिशल डेव्हलप भारत ग्रुपच्या सदस्यांनी अयोध्येतील राम मंदिराजवळ त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी संकेत कुटे, दिलीप राठी, चैतन्य पाटील, विनोद राठी, घनशाम निषाद, विवेक फडणीस, अजित देशमुख, पुनम राजपुत,ईश्वर मुठा,आकाश जोडगुद्री, प्रणय गोस्वामी, राकेश खत्री, सुदीप राजन व पिंपळे सौदागर-रहाटणी भागातील इतर रामभक्त उपस्थित होते.**




**शिक्षण दिले तर देशाचे भवितव्य घडू शकेल यावर विश्वास ठेवून त्यांनी आपल्या कामाचा पसारा उभा केला आहे. माधव साठे या माणसाबद्दल मला तुम्हाला सांगायचं आहे कारण आपल्या देशाला त्याच्यासारख्या स्त्रीपुरुषांची जास्त गरज आहे. माधव एक डॉक्टर आहेत, भूलतज्ज्ञ आहेत. गरजू लोकांच्या व्यथांमुळे ते अस्वस्थ होतात आणि त्यांच्यासाठी काहीतरी करू बघतात.**

# जग बदलण्याचे स्वप्न



या एका पैलूमुळेच ते इतरांपेक्षा वेगळे ठरतात.ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांमध्ये त्यांना सध्या रस आहे. महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील राजगुरुनगरमध्ये दुर्गम भागात असलेल्या ९० खेड्यांमधील मुख्यत: आदिवासी विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षकांचे जीवन माधव साठे यांनी एकहाती बदलून टाकले आहे. त्यांच्या एकट्याच्या अथक परिश्रमाचा फायदा राजगुरुनगर आणि आसपासच्या जिल्हा परिषदेच्या ४९ आदिवासी शाळा, ७३ हायस्कूल आणि ४६८ प्राथमिक शाळांमधील ४३ हजारांहून अधिक विद्यार्थी आणि १२०० शिक्षकांना झाला आहे.माधव साठे त्यांच्या डॉक्टर पत्नी आणि मुलीसह मुंबईत राहतात. आठवड्यातून पाच दिवस ते त्यांच्या शस्त्रक्रियांमध्ये व्यग्र असतात. आठवड्याच्या शेवटी ते राजगुरुनगरला जातात. ते कारने मुंबईहून तीन तासांच्या अंतरावर आहे. तिथे ते जे काम करतात, त्यामुळे ध्येयवेडा माणूस अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गावकरी, मुले आणि अर्थातच साठे यांच्या या निस्वार्थ सेवेत झोकून देणारे शिक्षक माधव साठे यांची आतुरतेने वाट पाहत असतात. त्यांनी राजगुरुनगरमध्ये काम करायला सुरुवात केली तेव्हा मी आणि माझी पत्नी राजगुरुनगरला वर्षातून दोनदा तरी भेट द्यायचोच. गेली २५ वर्षे मी बॉम्बे मदर्स अँड चिल्ड्रन वेलफेअर सोसायटीचा अध्यक्ष आहे. माधव साठे तर वैद्यकीय महाविद्यालयातून पदवीधर झाल्यापासून म्हणजे ४० किंवा त्याहून अधिक काळ या संस्थेचे सचिव आहेत. मी सरकारी नोकरीतील निवृत्तीनंतर मुंबईत स्थायिक झालो, तेव्हा भारतीय पोलीस सेवेतील माझ्या एका तरुण सहकाऱ्यासह माधव साठे मला भेटायला आले आणि त्यांनी मला सोसायटीचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. त्यानुसार मी ते स्वीकारले. त्यावेळी बॉम्बे मदर्स ॲण्ड चिल्ड्रन्स वेल्फेअर सोसायटी मुंबई शहरात गरजवंतांसाठी दोन रुग्णालये आणि नोकरी करणाऱ्या मातांच्या मुलांसाठी तीन पाळणाघरे चालवत होती. माधव यांनी त्यांच्या या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवली. मुंबईबाहेरचे दोन उपक्रम राजगुरुनगर आणि भिलवडी येथे होते तिथे सोसायटीने छोटी ग्रामीण रुग्णालये उभारली होती. बॉम्बे मदर्स ॲण्ड चिल्ड्रन्स वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक डॉ. टिळक आणि म्हसकर यांचे अनेक वर्षांपूर्वी निधन झाले होते. माधव या संस्थेचे व्यवहार एकहाती आणि अत्यंत मनापासून आणि प्रामाणिकपणे करत होते. त्यांना संस्थेला स्वावलंबी करायचे होते. त्यांना अधूनमधून सरकार आणि महापालिका अधिकाऱ्यांकडून काही मदत हवी असायची. अध्यक्ष या नात्याने मी ती मिळवून द्यायचो. राजगुरुनगर येथील रुग्णालयाने माधव यांना दुर्बल आणि गरजूंच्या सेवेसाठी स्प्रिंग बोर्ड उपलब्ध करून दिला. सार्वजनिक सेवेसाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यातील डॉ. बानू कोयाजी यांनी माधव यांना राजगुरुनगरमधील आरोग्य प्रकल्पावर काम करण्यासाठी भरीव रक्कम देऊ केली. त्यांनी दिलेले पैसे संपल्यावर माधव यांनी निधीसाठी त्यांच्या डॉक्टर मित्रांशी संपर्क साधला. माधव यांच्या सामाजिक कार्यासाठीच्या तळमळीबद्दल माहिती असलेल्या त्यांच्या मित्रांनी कोणताही किंतु न ठेवता तो दिला.माधव राजगुरुनगरच्या जवळपास ९० गावांच्या उन्नतीमध्ये पूर्णपणे बुडून गेले आहेत. त्यांनी प्रामुख्याने त्या भागातील मुला-मुलींच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे चेअरमन आणि चेअरमनच्या पत्नी माला रामदुराई यांनी संगणक उपलब्ध करून दिले आहेत. त्याचबरोबर १० वर्षांच्या कालावधीसाठी ६०० जिल्हा परिषद शाळांना ई-लर्निंग देखील उपलब्ध करून देण्यात आले आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी ते वरदानच आहे. या परिसरात वाय-फाय कनेक्टिव्हिटी नव्हती. विद्युत पुरवठा सतत खंडीत होत असे. पण माधव खचले नाहीत.

## संपादकीय »

# अमृतांजन...

***गरीब, महिला, युवक आणि शेतकरी या अर्थमंत्र्यांच्या चार प्राधान्यक्रमांमध्ये विकासवाटेत मागे पडलेल्या पगारदार निम्नमध्यमवर्ग, मध्यमवर्गाचे काय?***

काही प्रसंग असेच असतात की त्यावरील संभाव्य प्रतिसाद हा अगदी तंतोतंत ठरल्याप्रमाणेच असतो. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अर्थसंकल्पसदृश लेखानुदानाचे भाषण हे मोदी सरकारच्या केवळ गेल्या वर्षभरातीलच नव्हे तर मागील दशकभरातील कर्तृत्वांचा पाढा वाचणारे असेल, हे पूर्वानुमानितच होते. निवडणुकांच्या तोंडावर त्यांच्या भाषणाचा सूर हा असा असणे अपेक्षितच होते. अगदी विरोधी बाकांवरून अर्थसंकल्प कसा गरीब, निम्नमध्यमवर्गीय घटकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने अपयशी ठरला, अशा ठरावीक टीकेच्या पठडीप्रमाणेच, आता सत्ताधारी बाकावरून केलेल्या सीतारामन यांच्या भाषणातही कोणताच आश्चर्याचा घटक नव्हता. २०१९ प्रमाणे पहिल्यांदा फेब्रुवारीत आणि नंतर जुलैमध्ये असे एकाच वर्षांत दोनदा अर्थसंकल्प सादर करण्याचा मोह यंदा टाळला गेला, हे उत्तमच.

**वर्ष होते १९७१! सागरी आणि जमिनीवरील पर्यावरणातील पाणथळ प्रदेशांचे महत्त्व जगभरातील धोरणकर्त्यांपुढे मांडणे आणि या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील भागांना संरक्षण मिळवून देणे हा या परिषदेचा हेतू होता.**

# पाणथळींच्या रक्षणाचे भान कधी येणार?



पुढे दरवर्षी २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक पाणथळ जागा दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.पाणथळ प्रदेश म्हणजे नदी, तलाव, सागरी किनारे अशा ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व अनेकविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडपांनी भरलेल्या जागा. त्यामध्ये कृत्रिम तलाव व कालवे, मिठागरे, सांडपाण्याचे तलाव, मत्सशेती तलाव, शेततळी, भाताची खाचरे अशा मानवनिर्मित स्थळांचाही समावेश होतो. भूगर्भातील पाणी वर्षागणिक अधिकाधिक प्रमाणात उपसले जाऊ लागले आहे. अशा रित्या होणाऱ्या भूजलसाठ्यांचे पुनर्भरण करण्याचे काम असे प्रदेश करतात.अनेक जलस्रोतांच्या किनारी राडारोडा टाकला जातो, जलाशयांत घातक सांडपाणी सोडले जाते. पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पतीच असे दूषित घटक गाळण्याचे काम करून पाणी शुद्ध करतात. उदा. कोलकात्यातून बाहेर टाकल्या जाणाऱ्या दूषित पाण्याचा काही भाग शुद्ध करण्यासाठी जवळच्या पाणथळ प्रदेशाचा वापर केला जातो. भातखाचरे आणि मत्सबीज उत्पादनासाठी बनवलेली तळी यादेखील पाणथळ जागाच असल्याने त्यांमधून जगभरातील ३ अब्ज लोकांना दररोजचे अन्न- भात आणि मासे मिळतात. सागरी किनारपट्टीवर असलेल्या अशा गवतयुक्त पाणथळ प्रदेशांमुळे लाटांमुळे होणारी किनाऱ्यांची धूप थांबते. शिवाय समुद्राचे आक्रमण थोपवून किनारी जमीन अतिक्षारयुक्त- निरुपयोगी खारपड होण्याच्या क्रियेचा वेगही तेथील खारफुटींमुळे कमी होतो. नदीला पूर आल्यास किंवा अतिवृष्टी झाल्यास जास्तीचे पाणी किनारी पाणथळ प्रदेशांत मुरते व मानवी वस्ती जलमय होण्याच्या संभाव्य धोक्याचे प्रमाण कमी होते. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसते, की येथील महत्त्वाचे पाणथळ प्रदेश हे दख्खनच्या पठारावरील नद्या-उपनद्या, धरणांमागील जलाशय आणि पाझर तलावांच्या आसपासच्या परिसंस्था आहेत. यामुळे भूजलाचे पुनर्भरण आणि पाझर यात मोलाची मदत होते.बगळे, बदके, करकोचे, खंड्या तसेच शिकारी प्रजातींच्या व इतरही अनेक पक्ष्यांना या पाणथळ प्रदेशांतच अधिवास मिळतो. प्लवर सारख्या विशिष्ट प्रजातींची घरटी पाणथळ प्रदेशांत आढळतात. करकोचे, शराटी- इबिस, चमचा, रोहित- फ्लेमिंगो हे पक्षीही पाणथळ जागीच येतात. अगदी सायबेरियासारख्या प्रदेशांतूनही क्रेन आणि बदके इथे येतात. कारण इथे त्यांना अन्न मिळते. हे पक्षी या प्रदेशातील अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा दुवा असतात. आज पाणथळ प्रदेशांकडे वाया गेलेली जमीन म्हणूनच पाहिले जाते, पण जैविक आणि पर्यावरणीय साखळीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन त्यांचे जतन करून, तिथला कचरा दूर करून त्यांचा सजगतेने वापर करणे गरजेचे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गळ्यात गळे घालायला मी फडणवीस नाही!

## आमच्या पक्षाचे निर्णय आम्हीच घेतो : अंजली दमानिया

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गुरुवारी (१ फेब्रुवारी) रात्री केलेल्या एका सोशल मीडिया पोस्टमुळे राजकीय वर्तुळात नवी चर्चा सुरू झाली. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटातील वरिष्ठ नेते छगन भुजबळ सध्या राज्य सरकार आणि त्यांचा पक्षावरही नाराज आहेत.**

२७ जानेवारी रोजी राज्य सरकारने मराठा समाजासाठी काढलेल्या अध्यादेशावर छगन भुजबळ यांनी कडाडून टीका केली. दरम्यान, राज्य सरकारविरोधात आक्रमक झालेल्या छगन भुजबळांपासून त्यांच्या पक्षाने आणि पक्षातील इतर नेत्यांनी अंतर राखलं आहे. अशातच अंजली दमानिया यांनी छगन भुजबळांबाबत केलेल्या दाव्यामुळे राजकारणात खळबळ उडाली. छगन भुजबळ हे भाजपाच्या वाटेवर असल्याची पोस्ट अंजली दमानिया यांनी एक्सवर केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दमानिया यांच्यावर टीका केली होती.देवेंद्र फडणवीस म्हणाले, “आमच्या पक्षाचे निर्णय आम्हीच घेतो. अंजली दमानिया आमच्या पक्षाचे निर्णय घेत नाहीत. अंजली दमानिया अलीकडच्या काळात शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांच्या अधिक संपर्कात आहेत, त्यामुळे त्या अशा पोस्ट शेअर करत असतील. छगन भुजबळ हे त्यांच्या पक्षात आहेत आणि आम्ही आमच्या पक्षात आहोत.फडणवीस यांच्या या वक्तव्यानंतर अंजली दमानिया यांनीदेखील त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच फडणवीस यांना टोला लगावला आहे.दमानिया यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे. यामध्ये म्हटलं आहे की, ज्यांच्या विरुद्ध लढलो, ज्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे



आरोप केले त्यांच्या गळ्यात गळे घालायला मी देवेंद्र फडणवीस नाही. अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे की, मी डोरीन फर्नांडिस प्रकरणाच्या वेळी खासदार सुप्रिया सुळेंच्या संपर्कात होते, त्यांना मी तीनदा भेटले, पण तेही फर्नांडिस कुटुंबाला घेऊन. त्यांनीदेखील राजकारण बाजूला ठेऊन मदत केली त्याबद्दल त्यांचा आदर. त्या खटल्याप्रकरणी मी तुम्हाला (फडणवीस) आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही भेटले होते. सगळ्याच राजकारणातल्या लोकांच्या संपर्कात तुम्ही लोक असता. आम्ही फक्त लोकांना होईल तेवढी मदत करतो. उघड्या डोळ्यांनी भ्रष्टाचार आणि तुमचं किळसवाणं राजकारण पाहवत नाही म्हणून लढतो.अंजली दमानिया यांच्या आरोपांवर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही प्रतिक्रिया दिली होती. बावनकुळे म्हणाले होते, “अंजली दमानिया यांना एवढंच सांगेन की, छगन भुजबळ भाजपाच्या संपर्कात नाहीत. त्यांनी स्वतः भाजपामध्ये येण्याची कधी इच्छादेखील व्यक्त केली नाही आणि ते कधी भाजपामध्ये येणारही नाहीत. चुकीच्या बातम्या पसरवणं योग्य नाही.अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे की, मी डोरीन फर्नांडिस प्रकरणाच्या वेळी खासदार सुप्रिया सुळेंच्या संपर्कात होते, त्यांना मी तीनदा भेटले, पण तेही फर्नांडिस कुटुंबाला घेऊन. त्यांनीदेखील राजकारण बाजूला ठेऊन मदत केली त्याबद्दल त्यांचा आदर. त्या खटल्याप्रकरणी मी तुम्हाला (फडणवीस) आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही भेटले

### राजकारण बाजूला ठेऊन मदत

» छगन भुजबळ हे भाजपाच्या वाटेवर असल्याची पोस्ट अंजली दमानिया यांनी एक्सवर केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दमानिया यांच्यावर टीका केली होती.देवेंद्र फडणवीस म्हणाले, “आमच्या पक्षाचे निर्णय आम्हीच घेतो. अंजली दमानिया आमच्या पक्षाचे निर्णय घेत नाहीत. अंजली दमानिया अलीकडच्या काळात शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांच्या अधिक संपर्कात आहेत, त्यामुळे त्या अशा पोस्ट शेअर करत असतील. छगन भुजबळ हे त्यांच्या पक्षात आहेत आणि आम्ही आमच्या पक्षात आहोत.फडणवीस यांच्या या वक्तव्यानंतर अंजली दमानिया यांनीदेखील त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच फडणवीस यांना टोला लगावला आहे. दमानिया यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे. यामध्ये म्हटलं आहे की, ज्यांच्या विरुद्ध लढलो, ज्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांच्या गळ्यात गळे घालायला मी देवेंद्र फडणवीस नाही. अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे की, मी डोरीन फर्नांडिस प्रकरणाच्या वेळी खासदार सुप्रिया सुळेंच्या संपर्कात होते, त्यांना मी तीनदा भेटले, पण तेही फर्नांडिस कुटुंबाला घेऊन. त्यांनीदेखील राजकारण बाजूला ठेऊन मदत केली.

होते. सगळ्याच राजकारणातल्या लोकांच्या संपर्कात तुम्ही लोक असता. आम्ही फक्त लोकांना होईल तेवढी मदत करतो. उघड्या डोळ्यांनी भ्रष्टाचार आणि तुमचं किळसवाणं राजकारण पाहवत नाही म्हणून लढतो. २७ जानेवारी रोजी राज्य सरकारने मराठा समाजासाठी काढलेल्या अध्यादेशावर छगन भुजबळ यांनी कडाडून टीका केली. दरम्यान, राज्य सरकारविरोधात आक्रमक झालेल्या छगन भुजबळांपासून त्यांच्या पक्षाने आणि पक्षातील इतर नेत्यांनी अंतर राखलं आहे. अशातच अंजली दमानिया यांनी भुजबळांबाबत केलेल्या दाव्यामुळे राजकारणात खळबळ उडाली.

# सगेसोयऱ्यांवरून जितेंद्र आव्हाडांचा राज्य सरकारला सवाल!

## समाजाला आरक्षण द्यावं; ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नये

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा समाजाने गेल्या काही महिन्यांमध्ये अनेक आंदोलनं आणि उपोषणं करून राज्य सरकारला जंग जंग पछाडलं. अखेर राज्य सरकारला कोंडीत पकडण्यासाठी मुंबईत चक्काजाम आंदोलन करण्यासाठी लाखो मराठा बांधवांनी मुंबईकडे कूच केली.**



मराठ्यांची ही पदयात्रा मुंबईच्या वेशीवर (वाशी, नवी मुंबई) पोहोचल्यावर राज्य सरकारने तातडीने मराठा आंदोलकांच्या काही मागण्या मान्य केल्या. त्यानुसार ज्या मराठा बांधवांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांना कुणबी जातप्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश केला जाणार आहे. तसेच कुणबी जातप्रमाणपत्र असलेल्या व्यक्तीच्या शपथपत्रावर त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही प्रमाणपत्र दिलं जाईल, याबाबत राज्य सरकारने अध्यादेश काढला आहे. यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत.राज्यभरातले अनेक ओबीसी नेते राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात आक्रमक झाले आहेत. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक

### आम्ही सगेसोयरे आहोत

» आपण सगळे बहुजन आहोत. बहुजनांमध्ये भांडणं लावून, कोंबडे झुंजवत ठेवून सत्ता लाटण्याचा प्रयत्न काही जणांकडून चालू आहे.जितेंद्र आव्हाड म्हणाले, मराठा आंदोलकांच्या मागण्यांबाबत राज्य सरकारने जो अध्यादेश काढला आहे, त्यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, कुणबी प्रमाणपत्र असलेल्या लोकांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र द्या. मग माझ्या नातेवाईकांना माझी जात लागणार का? माझी बायको ब्राह्मण आहे. तिच्या बहिणीला तुम्ही वंजारी म्हणून प्रमाणपत्र देणार का? आम्ही सगेसोयरे आहोत.

भूमिका घेतली आहे. अशातच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटातूनही पाठिंबा मिळू लागला आहे. शरद पवार गटातील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भुजबळांची मागणी योग्य असल्याचं वक्तव्य केलं आहे. तसेच तुम्ही सरकारमधून बाहेर पडून तुमची मागणी लावून धरा, आम्ही तुमच्याबरोबर आहोत, असंही आव्हाड म्हणाले. आव्हाड यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषदेत यावर भाष्य केलं.शरद पवार गटातील आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण द्यावं अशी आमची मागणी आहे. परंतु, मराठा सामाजाला आरक्षण देताना ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये. ही आमची भूमिका आहे. आम्ही आज आमच्या सर्व कार्यकर्त्यांनाही तेच सांगितलं आहे.

# ज्ञानवापी तळघरात पूजा सुरुच राहणार!

## पूजेला स्थगिती देण्यास अलाहाबाद न्यायालयाचा नकार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**ज्ञानवापी मशिदीमधील (GYANVAPI CASE) तळघरातील पूजेला स्थगिती देण्यास अलाहाबाद उच्च न्यायालयाने नकार दिलाय. तसेच तळघरातील पूजा ही नेहमीप्रमाणे सुरुच राहणार असल्याचं देखील यावेळी न्यायालयाने सांगितलं. अलाहाबाद न्यायालयाच्या या निर्णयामुळे ज्ञानवापी मशीद कमिटीला कोणत्याही प्रकारचा दिलासा मिळाला नाही. ज्ञानवापीच्या तळघरात पूजा करण्याची मुभा देण्याचे आदेश जिल्हा न्यायालयाने दिले होते.**



अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या या आदेशांविरोधात मशीद कमिटी उच्च न्यायालयात अपीलात आली होती. पूजेला स्थगिती देण्यासाठी या कमिटीकडून याचिका करण्यात आली होती. पण उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिलाय. तसेच राज्य सरकारने कायदा सुव्यवस्था पाहावी असेही निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेत. वाराणसीतील ज्ञानवापी तळघरात ही पूजा होणार आहे. जिल्हा न्यायालयाने हा आदेश दिला आहे. हिंदू याचिकाकर्त्यांच्या बाजूने निकाल देण्यात आला. हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी सांगितले की,व्यास कुटुंबीय आता तळघरात पूजा करणार आहेत. हिंदू पक्षाने व्यासजींच्या तळघरात पूजा करण्याची परवानगी मागितली होती. सोमनाथ व्यास यांचे कुटुंब 1993 पर्यंत तळघरात पूजा करत होते. 1993 नंतर तत्कालीन राज्य सरकारच्या आदेशावरून तळघरातील पूजा बंद करण्यात आली. वाराणसी कोर्टाच्या निकालानंतर नंदीच्या समोरून व्यासजीच्या तळघरात जाण्याचा मार्ग तयार करण्यात येणार आहे. कोर्टाच्या आदेशानंतर जिल्हा प्रशासनाच्या पातळीवर कारवाई करण्यात येणार आहे. कोर्टाने सात दिवसांच्या आत वाराणसीच्या जिल्हाधिकाऱ्यांना पूजेची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. दुसरीकडे, अलाहाबाद उच्च न्यायालयाने बुधवारी राखी सिंहच्या पुनर्विचार याचिकेवर ज्ञानवापी मशिदीच्या अंजुमन इंतेजामिया मस्जिद समितीला नोटीस बजावली. वाराणसी कोर्टाने ज्ञानवापी मशीद परिसरातील कथित शिवलिंग वगळता वजुखानाचे सर्वेक्षण करण्यास भारतीय पुरात्व विभागाला सर्वेक्षण करण्यास मनाई केली होती. त्या निर्णयाला याचिकाकर्त्या राखी सिंह यांनी आव्हान दिले आहे. कडेकोट बंदोबस्तात, एएसआयच्या टीमने मुख्य आवारातून घुमट, व्यासजींच्या तळघर आणि इतर भागात जाऊन तपास केला. तळघर सर्वेक्षणादरम्यान अनेक महत्त्वाचे पुरावे गोळा करण्यात आले होते. त्यावेळी माती, विटा, दगडाचे नमुनेही घेण्यात आले. या नमुन्यांच्या मदतीने, बांधकामाचा कालावधी आणि वय निश्चित केलं जाणार होतं.गेल्या दोन दिवसांपासून ज्ञानवापी मशिदीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

मशिदीच्या तळघरात पूजा करण्यास वाराणसी जिल्हा न्यायालयाने परवानगी दिली. त्यानुसार ३१ जानेवारी रोजी 'व्यास जी का तहखाना' म्हणून ओखळल्या जाणाऱ्या भागात पूजा करण्यात आली. या निर्णयाल स्थगिती देण्याची मागणी ज्ञानवापी मशीद समितीनं अलाहाबाद उच्च न्यायालयात केली होती. मात्र, न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली असून राज्य सरकारला या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आदेश दिले आहेत.मशीद समितीनं जिल्हा न्यायालयाच्या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी फेटाळत मशीद समितीला अलाहाबाद उच्च न्यायालयात दाद मागण्याचे निर्देश दिले होते.

आता उच्च न्यायालयानेही समितीची मागणी फेटाळली आहे. त्यामुळे तळघरातील पूजा सध्या तरी चालूच राहणार आहे. बुधवारी ३१ जानेवारी रोजी जिल्हा न्यायालयानं मशीदीच्या तळघरातील दक्षिणेकडच्या भागात पूजा करण्यास परवानगी दिली. या भागाला 'व्यास जी का तहखाना' म्हटलं जातं. त्यानुसार ३१ जानेवारी रोजी या ठिकाणी पूजा करण्यात आली. या पूजेचे फोटोही मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले. त्यानंतर गुरुवारी १ फेब्रुवारी रोजी ज्ञानवापी मशीद व्यवस्थापन समितीनं जिल्हा न्यायालयाच्या या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात तातडीची सुनावणी घ्यावी म्हणून दाद मागितली. मात्र, न्यायालयाने यासंदर्भात उच्च न्यायालयात दाद मागण्याचे निर्देश पक्षकारांना दिले.

### 1993 साली थांबली होती पूजा!

» सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार अलाहाबाद उच्च न्यायालयात मशीद समितीनं याचिका दाखल केली. तळघरात पूजा करण्यास परवानगी देण्याच्या निकालाला याचिकेतून आव्हान देण्यात आलं. तसेच, सध्या चालू असणाऱ्या पूजाविधींवर स्थगिती आणली जावी, अशी मागणीही याचिकेद्वारे करण्यात आली.दरम्यान, १९९३ साली म्हणजेच ३० वर्षांपूर्वी तळघरातील 'व्यास जी का तहखाना' भागात होणारे पूजाविधी थांबले होते. तोपर्यंत व्यास कुटुंबाकडून या भागात पूजाविधी केले जात होते. मात्र, तत्कालीन राज्य सरकारने दिलेल्या निर्देशांनुसार या भागातील पूजाविधी थांबवण्यात आले होते.अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या या आदेशांविरोधात मशीद कमिटी उच्च न्यायालयात अपीलात आली होती. पूजेला स्थगिती देण्यासाठी या कमिटीकडून याचिका करण्यात आली होती. पण उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिलाय. तसेच राज्य सरकारने कायदा सुव्यवस्था पाहावी असेही निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेत. वाराणसीतील ज्ञानवापी तळघरात ही पूजा होणार आहे. जिल्हा न्यायालयाने हा आदेश दिला आहे. हिंदू याचिकाकर्त्यांच्या बाजूने निकाल देण्यात आला. हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी सांगितले.

# भाजपाचा पुढचा पंतप्रधान मोदींपेक्षा जहाल!

## योगी एकट्याच्या जिवावर उत्तर प्रदेश जिंकून आणू शकत नाहीत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये पूर्ण बहुमताचा दावा भाजपाकडून केला जात आहे. काही राजकीय विश्लेषकांकडून जागा कमी झाल्या तरी भाजपाचं सरकार येईल असं म्हटलं जात आहे. तर काहींच्या मते या निवडणुकीत विरोधी पक्षांकडून भाजपाला धोबीपछाड दिली जाऊ शकते.**

मात्र, अनेक चर्चांमधून एक समान प्रश्न विचारला जातो तो म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींनंतर भाजपाकडे कोणता पर्याय आहे? ज्याप्रकारे सध्या राष्ट्रीय राजकारणात 'मोदी नाही तर कोण?' असा प्रश्न केला जातो, तसाच आता 'भाजपामध्ये मोदींनंतर कोण' असा प्रश्न चर्चेत येऊ लागला आहे. नेमका याच मुद्द्यावर निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी सविस्तर भाष्य केलं आहे. ते 'इंडियन एक्स्प्रेस अड्डा'मध्ये बोलत होते. यावेळी बोलताना प्रशांत किशोर यांनी नरेंद्र मोदी-अमित शाह व अटल बिहारी वाजपेयी-लालकृष्ण आडवाणी यांच्या कामाच्या पद्धतीची, विचारसरणीची आणि दृष्टीकोनाची तुलना केली. "तुम्ही सेहवाग आणि



द्रविड एकाच वेळी असू शकत नाही. त्याचप्रमाणे तुम्ही सोनिया गांधी आणि इंदिरा गांधी एकाच वेळी असू शकत नाहीत. त्या दोघींनी एकच पक्ष, एकच विचारसरणी, एकाच प्रकारच्या लोकांसोबत काम केलंय, पण दोघींचा करण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. त्याचप्रमाणे मोदींचा दृष्टीकोन वाजपेयींपेक्षा वेगळा आहे. ते दोघे एकाच विचारसरणीचे असूनही त्यांची पद्धत वेगवेगळी आहे. त्यामुळे आता मोदी-शाहा अचानक वाजपेयींसारखे सर्वांच्या सहमतीने चालणारे होऊ शकत नाहीत. ते जे करत आले आहेत, तेच त्यांना करत राहावं लागणार आहे", असं प्रशांत किशोर म्हणाले."मला कुणीतरी विचारलं की मोदींचा वारसदार कोण असेल? मी नेहमी म्हणतो की ते कुणालाही माहिती नाही. कुणीही त्याबद्दलचा अंदाज बांधायला नको.

### मोदी-शाह आणि वाजपेयी-आडवाणी!

» पण एक मात्र नक्की आहे. जो कुणी त्यांच्यानंतर येईल, तो मोदींपेक्षा जास्त जहाल असेल. तेव्हा तुलनेनं मोदी भाजपाच्या पुढील पंतप्रधानापेक्षा जास्त मुक्त विचारांचे वाटू लागतील", असं सूचक विधान यावेळी प्रशांत किशोर यांनी केलं आहे.सर्व भाजपाचे मुख्यमंत्री आज त्यांच्या आधीच्या मुख्यमंत्र्यांपेक्षा जास्त कट्टर हिंदुत्ववादी भासवण्याच्या स्पर्धेत आहेत. त्यामुळे आज मध्य प्रदेश किंवा राजस्थानचे मुख्यमंत्री सातत्याने त्यांच्या आधीच्या मुख्यमंत्र्यांपेक्षा जास्त जहाल वाटण्याचा प्रयत्न करत आहेत. हे चालत आलं आहे. त्यामुळे त्या जागी जो कुणी येईल, त्याला तसं वागण्याशिवाय दुसरा कुठला पर्यायच नाही", अशी पुस्तीही यावर प्रशांत किशोर यांनी जोडली.

# माझं आयुष्य सफलतेकडे जात आहेः मुन्नवर फारुकी

छोट्या पडद्यावरिल बिग बॉस 17 (BIG BOSS 17) या रिॲलिटी शोचा मुन्नवर फारुकी (MUNAWAR FARUQUI) हा विजेता ठरला. बॉलिवूड अभिनेता सलमान खानकडून (SALMAN KHAN) त्याला विजयी घोषित करण्यात आल्यानंतर तो ट्रॉफी घेऊन डोंगरीत पोहोचला. यावेळी मुन्नवरला शुभेच्छा देण्यासाठी आणि त्याच्या स्वागतासाठी डोंगरीत चाहत्यांची मोठी गर्दी जमली होती. बॉलिवूडचा किंगखान शारुख बाहेर पडल्यानंतर चाहते त्याला पाहण्यासाठी गर्दी करतात. त्याप्रमाणे मुन्नवरलाही लोकांचे प्रेम मिळाले. दरम्यान, डोंगरीत जमलेल्या गर्दीबाबत मुन्नवर फारुकीने त्याची प्रतिक्रिया





दिली आहे. शारुख खानला पाहण्यासाठी जशी गर्दी जमते. तशीच गर्दी तुला पाहण्यासाठी जमली होती. त्याबद्दल तुला काय वाटतं? असा सवाल फारुकीला विचारण्यात आला होता. यावर प्रत्युत्तर देताना मुन्नवर म्हणाला, "मी बिग बॉस 17 चा खिताब जिंकला होता त्यामुळे गर्दी झाली. शारुख भाई रोज आले तरीही एवढीच गर्दी जमेल. आमच्यात कधीही तुलना शक्य नाही. मात्र, हे लोकांचे प्रेम आहे. पण शारुखसोबत कोणी मला 1 टक्क्याने जरी तुलना करत असेल तर माझं आयुष्य सफलतेकडे जात आहे, असे मी समजेन."बिग बॉस 17 चा विजेता मुन्नवर फारुकी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुन्नवरचा चाहता युसूफ खान यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्यात आलाय.

# 'नो एन्ट्री 2' मधून सलमानचा पत्ता कट

बॉलिवूड अभिनेता सलामान खान (SALMAN KHAN) याच्या बिग बॉस या रिॲलिटी शोचा महाअंतिम सोहळा नुकताच पार पडला. दरम्यान, सलमान खान (SALMAN KHAN) आता एका सिनेमामुळे चर्चेत आला आहे. सलमानच्या आगामी सिनेमांची यादी फार मोठी आहे. मात्र, 'नो एन्ट्री 2' या सिनेमातून सलमान खानचा पत्ता कटलाय. 'नो एन्ट्री 2' नवे कलाकार पाहायला मिळणार आहेत. त्यामुळे अभिनेता सलमान खान, अनिल कपूर आणि फरदीन खान यांना निर्मात्यांनी बाहेरचा रस्ता दाखवलाय. सलमान खानची मुख्य भूमिका असलेला 'नो एन्ट्री' हा सिनेमा 2005 मध्ये रिलीज झाला होता. 'नो एन्ट्री 2' मध्ये देखील सलमान खानला कास्ट केले जाईल, असे बोलले जात होते. त्यामुळे 'नो एन्ट्री 2' मध्ये नव्या 3 कलाकारांची एन्ट्री झालीये. पिंकव्हिलाच्या रिपोर्ट्नुसार, 'नो एन्ट्री 2' मध्ये वरुण धवन, अर्जुन कपूर आणि दिलजीत दोसांझ हे 3 कलाकार पाहायला मिळणार आहेत. निर्मात्यांनी या 3 कलाकारांशी बातचीत देखील केली आहे. इतकेच नव्हे तर हे 3 अभिनेते डिसेंबरपासून शूटींगला देखील सुरुवात करणार आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, निर्मात्यांनी नो एंट्री ला 20 वर्षे पूर्ण होणार असल्याच्या निमित्ताने 'नो एंट्री 2'रिलीज करण्याचा विचार केला आहे. दिग्दर्शक म्हणऊन अनीस बाजमी यांचे नाव समोर आले आहे. मात्र, 'नो एंट्री 2'स्टार्स आणि शूटींगबाबत अधिकृतरित्या कोणतीही माहिती समोर आलेली नाही.



# पूनमच्या कुटुंबियांना टाकले होते वाळीत

अभिनेत्री पूनम पांडेच्या (POONAM PANDEY) निधनानंतर संपूर्ण फिल्म इंडस्ट्री शोकाकुल अवस्थेत आहे. पूनमच्या (POONAM PANDEY) निधनानंतर सोशल मीडियावरही उलट सूलट प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. बॉलिवूडमधील अनेक सेलिब्रिटींना देखील पूनमच्या अचानक जाण्याने धक्का बसलाय. कंगणा राणावतनेही (KANGANA) पूनमच्या निधनानंतर दु:ख व्यक्त केलंय. कंगणा राणावतच्या 2022 मध्ये आयोजित केलेल्या 'लॉक अप' या रिॲलिटी शोमध्ये पूनम देखील दाखल झाली होती. पूनम वाद आणि भांडणामुळे चर्चेत आली होती. दरम्यान, याच शोमध्ये पूनम कौटुंबिक समस्या आणि पती सोडून गेल्याने भावनांना वाट करुन दिली होती. पूनमने या शोच्या एका एपिसोडमध्ये सांगितले की, "पूनमच्या खराब झालेल्या इमेजमुळे समाजाने तिच्या कुटुंबियांना वाळीत टाकण्यात आले होते. शिवाय पतीही सोडून गेला होता."पूनमने अभिनेता करणवीर बोहरा याच्या बोलताना म्हटले की, "मी 3-4 वर्षांपूर्वी घडलेलं सांगत आहे. माझे आई-वडिल आणि बहिण आम्ही सारे एकत्रित राहत होतो. ते माझ्या कुटुंबाचे सदस्य होते. त्यामुळे त्यांना वाळीत टाकण्यात आले होते. तेव्हा माझे आई-वडिल मला काहीच म्हटले नाहीत. कारण कुटुंबाचा सर्व खर्च मी उचलत होते. मी कधी कोणाबाबत चुकीचे बोलले का? अशा प्रकारचे एक तरी आर्टिकल मला आणून दाखवा. मी फक्त माझे काम करत असते", अशी प्रतिक्रिया पूनमने व्यक्त केली होती.

# झोया उर्फ सुरभी ज्योती लग्न करणार



सध्या मनोरंजन विश्वातही लगीन घाई सुरु आहे. नुकतीच आमिर खानची मुलगी आयरा खानने नुपूर शिखरेसोबत लग्न केलं तर अभिनेत्री रकुल प्रीतने देखील तिचा बॉयफ्रेंड जॅकी भगनानीसोबत लग्न करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आता आणखी एका अभिनेत्री नववधू होण्यासाठी तयार असल्याच्या चर्चा आहेत. ती अभिनेत्री म्हणजे कबूल है फेम अभिनेत्री सुरभी ज्योती. सर्वांची लाडकी झोया म्हणजेच सुरभी ज्योती तिचा बॉयफ्रेंड सुमित सुरीसोबत लग्न करणार आहे. सुरभी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती तिच्या कामाव्यतिरिक्त लव्ह लाईफमुळे देखील चर्चेत राहिली आहे. सुमित सुरीपुर्वी सुरभीचे नाव अभिनेता पर्ल व्ही पुरीशी जोडले गेले होते. आता सुरभीच्या लग्नाची सोशल मिडियावर चर्चा होत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सुरभी ज्योती सुमित सुरीसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. सुमित हा बिझनेसमॅन असण्याबरोबरच अभिनेता आणि निर्माता आहे. सुरभी बऱ्याच वर्षांपासून सुमितला डेट करत आहे. सुरभी आणि सुमित हे 6 किंवा 7 मार्चला लग्न करणार असल्याचा दावा सुरभीच्या जवळच्या मैत्रिणीने केला आहे. तिच्या लग्नात फक्त कुटुंब आणि मित्र उपस्थित राहणार आहेत. सुमित सूरीने द टेस्ट केस आणि होम सारख्या ओटीटी शोमध्ये काम केले आहे. त्याने सुरभीसोबत एका म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले आहे. 2018 मध्ये त्याच्या नात्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या.

# जैस्वालने 'यशस्वी'पणे लढवला किल्ला!

## पहिल्या दिवशी इंडियाने 6 गडी गमावून उभारला धावांचा डोंगर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**विशाखापट्टणम येथे भारत आणि इंग्लंड संघांतील कसोटी मालिकेतील दुसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतला होता. त्यानुसार भारतीय संघाने पहिल्या दिवशी ९३ षटकानंतर यशस्वी जैस्वालच्या नाबाद १७९ धावांच्या जोरावर सहा गडी गमावून ३३६ धावांचा डोंगर उभारला आहे. त्यामुळे भारतीय संघ मजबूत स्थितीत दिसत आहे.**




दुसऱ्या कसोटीत पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने पहिल्या डावात सहा गडी गमावून ३३६ धावा केल्या आहेत. यशस्वी जैस्वाल १७९ धावांवर नाबाद असून रविचंद्रन अश्विन पाच धावांवर नाबाद आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताची सुरुवात चांगली झाली होती. रोहितने यशस्वीसह पहिल्या विकेटसाठी ४० धावांची भागीदारी केली. तो १४ धावा करून बाद झाला. यानंतर यशस्वीने शुबमन गिलसह दुसऱ्या विकेटसाठी ४९ धावांची भागीदारी केली.शुबमन पुन्हा एकदा फ्लॉप ठरला आणि ३४ धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत पाच चौकार मारले. श्रेयस अय्यर २७ धावा करून झेलबाद झाला. बाद होण्यापूर्वी श्रेयसने यशस्वीसोबत ९० धावांची भागीदारी केली. कसोटी पदार्पण करणारा रजत पाटीदारने ३२ धावांची खेळी केली आणि तो दुर्दैवाने बाद झाला. त्याने यशस्वीसोबत ७० धावांची भागीदारी केली. त्यानंतर यशस्वीने अक्षरसोबत ५२ धावांची भागीदारी केली. अक्षरने २७ धावांचे योगदान दिले.त्याचबरोबर श्रीकर भरत १७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. सध्या यशस्वीने १७९ धावांच्या खेळीत १७ चौकार आणि पाच षटकार मारले आहेत. भारतीय संघ शनिवारी ४००+ धावा करू इच्छितो. इंग्लंडकडून आतापर्यंत शोएब बशीर आणि रेहान अहमद यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले आहेत. त्याचबरोबर जेम्स अँडरसन आणि टॉम हार्टले यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली आहे.शुबमन गिलने पुन्हा एकदा चाहत्यांची निराशा केली आहे. विशाखापट्टणम कसोटीच्या पहिल्या डावात तो भारतासाठी विशेष काही करू शकला नाही. शुबमन अवघ्या ३४ धावा करून बाद झाला. तो खराब फॉर्ममधून जात आहे. जेम्स अँडरसनने शुबमनला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. शेवटच्या कसोटीतही तो स्वस्तात बाद झाला होता. आता पुन्हा एकदा दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात गिल लवकर बाद झाल्याने सोशल मीडियावर यूजर्सकडून ट्रोल केले जाऊ लागले आहे. वास्तविक, इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यादरम्यान रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल सलामीला आले होते. रोहित १४ धावा करून बाद झाला. रोहित बाद झाल्यानंतर शुबमन आला होता. तो ४६ चेंडूत ३४ धावा करून बाद झाला. त्याने पाच चौकार मारले. अँडरसन इंग्लंडकडून २९ वे षटक टाकत होता. या षटकाच्या पाचव्या चेंडूवर शुबमनला फॉक्सच्या झेलबाद केले.यानंतर गिलला सोशल मीडियावर यूजर्सकडून ट्रोल केले जाऊ लागले. एका यूजरने सोशल मीडियावर पोस्ट करत लिहिले, शुबमन गिल पुन्हा एकदा फ्लॉप ठरला. याशिवाय दुसऱ्या सामन्यात सरफराज खानला संधी न दिल्याने आणि गिलला खेळवल्याबद्दलही त्याला खूप ट्रोल केले जात आहे. आता पुन्हा एकदा सोशल मीडियावर शुबमन गिलला कसोटी संघातून वगळण्याची मागणी जोर धरू लागली आहे.या सामन्याच्या दुसऱ्या डावातही गिलची बॅट चालली नाही, तर त्याला कसोटी संघातून बाहेर केले जाऊ शकते. गिलला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीची संधी मिळाल्यापासून त्याची कसोटी क्रिकेटमधील कामगिरी ढासळत चालली आहे. त्यामुळे टीम इंडियाचा तणावही थोडा वाढू लागला आहे. या सामन्यात भारतीय संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्येही बदल दिसून आले. भारतीय संघात तीन बदल करण्यात आले. दुसऱ्या कसोटी सामन्यात मुकेश कुमार, कुलदीप यादव आणि रजत पाटीदार यांचा समावेश करण्यात आला. हैदराबाद कसोटीनंतर या सामन्यातून गिलला वगळले जाण्याची शक्यता होती.

### 'यशस्वी' च्या खेळीनंतर सचिन खूश

भारतीय संघाचा उगवता तारा, यशस्वी जैस्वाल दिवसेंदिवस आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून सतत उंच शिखरे गाठत आहे. मर्यादीत षटकांच्या क्रिकेटनंतर कसोटी चेंडूही क्रिकेटमध्ये यशस्वी सलामीवीर ठरत आहे. इंग्लंडविरुद्धच्या विशाखापट्टणम कसोटीच्या पहिल्या दिवशी त्याने उत्कृष्ट शतक झळकावले. हे त्याचे कसोटी कारकिर्दीतील दुसरे आणि भारतीय भूमीवरील पहिले शतक होते. त्याने आपल्या खेळीने सर्वांची मने जिंकली आणि क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरनेही त्याचे कौतुक केले. सचिनने सोशल मीडियावर यशस्वीसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे.

# समृद्धी लांडगे हिच्या लक्षवेधी खेळामुळे महाराष्ट्राला कांस्यपदक!

## 14 वर्षांखालील शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा; रोमहर्षक सामन्यात उत्तरप्रदेश संघावर विजय

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडची कन्या आणि अष्टपैलू कबड्डीपटू समृद्धी लांडगे हिने शेवटच्या क्षणी केलेल्या चढाईमध्ये क्रॉस लाईन करीत एक खेळाडू बाद केला आणि १४ वर्षांखालील शालेय मुलींचा महाराष्ट्र कबड्डी संघाने उत्तरप्रदेशवर ४ गुणांनी विजय मिळवला. या रोमहर्षक विजयामुळे महाराष्ट्राने कांस्यपदकावर मोहोर उमटवली.**



राजम पेठ, आंध्रप्रदेश येथे झालेल्या १४ वर्षांखालील शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये मुलींच्या महाराष्ट्र संघाने उत्तरप्रदेश संघाचा ५२/४९ असा ४ गुणांनी पराभव करत कास्यपदक पटकावले. अत्यंत चुरशीचा झालेल्या सामन्यात पिंपरी-चिंचवडची अष्टपैलू कबड्डीपटू समृद्धी लांडगे हिने महाराष्ट्राच्या संघाकडे विजय खेचून आणला.

महाराष्ट्र संघातून पुण्याची अष्टपैलू खेळाडू समृद्धी लांडगे, निकिता जाधव, सेरेना मस्कर, यशश्री इंगोले यांनी केलेल्या यशस्वी चढाया केल्या. तसेच, आरती खांडेकर, भूमिका माने, मृदुला मोहिते यांनी केलेल्या पकडी उत्कृष्ट ठरल्या. त्यांना श्रेया कुबरे, प्रतीक्षा राठोड, सेजल काकडे, अनुष्का चव्हाण यांनी उत्कृष्ट साथ दिली. कांस्यपदकासाठी महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश संघामध्ये अतितटीचा सामना झाला. शेवटचे काही सेकंद बाकी असताना ५२/४९ अशा ३ गुणांची आघाडी महाराष्ट्र संघाकडे होती. त्यावेळेस मैदानात महाराष्ट्र संघाचे समृद्धी लांडगे आणि आरती खांडेकर हे केवळ दोनच खेळाडू उरले होते. उत्तरप्रदेश संघ महाराष्ट्र संघाला लोन देऊन ५३/५२ अशी १ गुणाची आघाडी करत सामना जिंकणार असे चित्र दिसत होते. मात्र, चढाईसाठी महाराष्ट्र संघाकडून पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनी संघाची अष्टपैलू खेळाडू समृद्धी लांडगे हिने राईड केली असता तिला क्रॉस लाईनवर तिला पकडण्या प्रयत्न प्रतिस्पर्धी उत्तरप्रदेश संघाच्या खेळाडूंनी केला.



> महाराष्ट्राच्या १४ वर्षांखालील मुलींच्या शालेय कबड्डी संघाने राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेत संघातील सर्वच खेळाडूंनी लक्षवेधी कामगिरी केली. पिंपरी-चिंचवडची कन्या समृद्धी लांडगे हिने निर्णायक क्षणी उत्कृष्ट खेळ केला. पिंपरी-चिंचवडकरांसह महाराष्ट्रासाठी ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. विशेष म्हणजे, समृद्धी ही माझी पुतणी असल्याने मला विशेष समाधान वाटते. क्रीडा क्षेत्रात आवड असलेली आमची तिसरी पिढी आता मैदान गाजवू लागली आहे. तसेच, कबड्डी सारख्या पारंपरिक खेळाचा वारसा आमच्या लेकी जपताहेत याचा सार्थ अभिमान वाटतो.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.